# // प्रेसनोट //

## दि. २१/०५/२०२२

## दि. २२/०५/२०22 रोजीचेलसीकरणसत्रनियोजन

कोविड-१९ महामारीच्या प्रतिबंधासाठी दि. १६ जानेवारी २०२१ पासून संपूर्ण देशात व त्याअनुषंगाने राज्य शासनाच्या आदेशान्वये मिरा भाईंदर कार्यक्षेत्रात टप्पाटप्प्याने कोविड-१९ लसीकरण सत्रांचे नियोजन खालील नमूद वयोगट निहाय करण्यात येत आहे.

आतापर्यंत १५ वर्षावरील नागरिकांचे प्रथम डोस / दुसरा डोसकरीताचे तसेच ६० वर्षावरील सहव्याधी असलेल्या नागरिकांना दुसरा डोस घेतल्या नंतर ९ महिने (३९ आठवडे) पूर्ण झाले असल्यास प्रिकॉशन डोस (बुस्टर डोस) करीताचे लसीकरण सुरु होते. परंतु, या पुढे ६० वर्षावरील सर्व ज्येष्ठ नागरिकांचे दुसरा डोस घेऊन ९ महिने (३९ आठवडे) पूर्ण झाले असल्यास प्रिकॉशन डोस (बुस्टर डोस) करीताचे लसीकरण केले जाईल. तसेच वय वर्षे १४ ते १५ या वयोगटातील लाभार्थ्यां करीता कोवॅक्सीन लस देय राहील.

- दि.०९/०४/२०२२ रोजीच्या केंद्रशासनाच्या परिपत्रकातील निर्देशानुसार १८ वर्षा वरील नागरिकांकरिता खाजगी कोविड लसीकरण केंद्राच्या ठिकाणी दुसरा डोस घेऊन नऊ महिने पूर्ण झाले असल्यास बुस्टर डोस देय राहील.
- दि.२२/०५/२०२२ रोजी मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील शासकीय कोविड लसीकरण केंद्र बंद राहतील.
- तरी कोविड लसीकरण केंद्राच्या ठिकाणी नागरीकांनी नाहक गरदी करु नये.
- शासना मार्फत प्राप्त होणाऱ्या लस साठाच्या उपलब्धे नुसार पुढील लसीकरण सत्राचे नियोजन करण्यात येईल. तरी महानगरपालिकेस सहकार्य करणे करीता मा. श्रीम. ज्योत्सना हसनाळे, महापौर, मिरा भाईंदर महानगरपालिका व मा. श्री. दिलीप ढोले, आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांच्या मार्फत मिरा भाईंदर शहरातील नागरिकांना आवाहन करण्यात येते.

डॉ. नंदकिशोर लहाने
वैद्यकीय आरोग्य अधिकारी
मिरा भाईंदर महानगरपालिका

मिरा भाईंदर महानगरपालिका
वैद्यकीय विभाग
लसीकरण सत्र नियोजन -22.05.2022
तक्ता क्र. 1

| अ.क्र. | कोविड लसीकरण केंद्राचे नाव | पत्ता | लसीचा प्रकार | एकूण डोसेस | लाभार्थी गट | वेळ | डोस | ऑनलाईन/ ऑफलाईन |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| NO SESSION | | | | | | | | |

* उद्या दि. २२.०५.२०२२ रोजी शासकीय कोविड लसीकरण केंद्र बंद राहतील.

* शासनामार्फत प्राप्त होणाऱ्या लससाठ्याच्या उपलब्धतेनुसार पुढील लसीकरण सत्राचे नियोजन करण्यात येईल याची नोंद नागरिकांनी घेण्यात यावी.